# साफसफाई निविदा प्रक्रिया २०२६ अटी व शर्ती

१. करारात ठरेल त्याप्रमाणे शा.तं. नि. मुर्तीजापुर येथील १५०६५ चौ. मीटर Plinth area (प्रशासकीय इमारत, कर्मशाळा, मुलांचे आणि मुलींचे वसतीगृह) या व्यतिरिक्त सर्व रस्ते, सांडपाण्याच्या सर्व नाल्या, पार्कींग एवढ्या जागेकरीता व सफाईसाठी मोबदला देय राहील. (सदर जागा व रस्ते संस्थेत निविदा सादर करण्यापुर्वी पाहुन व समजुन घ्यावेत) . सदर साफसफाई करिता अंशकालीन (४ तास) पाच पुरुष व एक महिला सफाईगार यांच्या सेवा दैनंदिन स्वरुपात एजन्सी मार्फत उपलब्ध करून द्याव्या लागतील.

२. आपण प्रत्येक महिन्याच्या आपल्या स्थरावर निर्धारित तारखेपर्यंत आपल्या सफाई कामगारांना पगार करावा व या बाबतीत सफाई कामगारांनी संस्थेकडे तक्रार करता कामा नये. त्याकरीता शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तीजापुर हि संस्था जबाबदार राहणार नाही.

३ सदर जागेतील संस्थेची साफसफाई उक्त नमूद मनुष्यबळा मार्फत कार्यालयीन दिवशी सकाळी ९.०० पासून सुरु करावे लागेल. उक्त नमूद जागांपैकीची साफसफाई संबंधित अधिकाऱ्यांने निर्धारित केलेल्या वेळापत्रकानुसार करणे बंधनकारक राहील. विशेषतः वर्गखोल्या, प्रयोगशाळा व कार्यालय यांची स्वच्छता सकाळी १०.३० पूर्वी करणे बंधनकारक राहील.

४ कोणतेही कारण न दाखवता करार रदद करण्याचे अधिकार शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तीजापुर या संस्थेच्या प्राचार्यानी राखुन ठेवलेले आहेत. निवेदेबाबत अंतिम निर्णय हा मा. प्राचार्य, शा.तं.नि. मुर्तीजापुर यांचा राहिल.

५ आपल्या एजन्सीचे काम समाधानकारक नसल्यास आपला करार त्वरीत रदद करण्यात येईल, याची सर्वस्वी जबाबदारी एजंसीवर राहील.

६ एजन्सीला सुरुवातीला ०२ महिने प्रायोगिक तत्वावर काम करण्याचे आदेश निर्गमित करण्यात येतील व काम समाधानकारक आढळल्यास उर्वरीत ०९ महिन्याच्या कालावधी करीता आदेश देण्यात येतील. सदर करार कालावधी संपुष्टात आल्यानंतर, मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तीजापुर यांनी राखून ठेवले आहेत.

७ सफाई करीता कंत्राटी आदेश दिल्यानंतर एक आठवडयाच्या आत आदेश स्विकारणे व आदेशात नमूद केल्यानुसार प्रत्यक्ष काम सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा निविदा भरतेवेळी जमा केलेली रक्कम शासन जमा करण्यात येईल व कोणत्याही परीस्थीतीत परत करण्यात येणार नाही.

८ आपल्या सफाईगाराची सेवा हि ठेकेदारी पदधतीची सेवा आंहे ज्यामुळे शासकीय सेवाद्वारे आपल्या आस्थापनेवरील कर्मचारी असल्यामुळे त्यांच्या सेवा शर्ती, सुटटया व इतर बाबींशी या कार्यालयाचा काहीही संबंध राहणार नाही.

९ जे सफाईगार / कर्मचारी या संस्थेत नेमल्या जातील त्यांच्या बाबतची माहिति उदा. नाव, पत्ता, शैक्षणीक अहर्ता, आधारकार्ड, अलीकडचा काढलेला पासपोर्ट आकाराचा फोटो आणि चारित्र्याबाबतचा आपला अभिप्राय इत्यादी माहिति संस्था प्रमुखास पुराव्यासहित देणे आवश्यक आहे.

१० एखादया सफाईगार / कर्मचा-याची सेवा आक्षेपार्ह वाटत असल्यास संस्थेच्या प्राचार्याची शिफारस असल्यास संबंधीत सफाईगार / कर्मचारी बदलुन दयावा लागेल.

Website I/C 13/3/26

११ एजन्सीला सफाई कामगारांची सेवा बंद करावयाची असल्यास एक महिन्याची पुर्व सुचना देणे आवश्यक राहील.

१२ सफाईगार/कर्मचारी कामावर कार्यरत असताना/येतांना/जातांना काही अपघात झाल्यास शा.तं. नि. मुर्तीजापुर हि संस्था नुकसान भरपाईस जबाबदार राहणार नाही. ती सर्वस्वी जबाबदारी एजन्सीवर राहील.

१३ सफाई कामगाराच्या अनुपस्थितीच्या बाबतीत मोबदला यथाप्रमाणे कमी करण्यात येईल.

१४ साफसफाई करीता लागणारे साहित्य कंत्राटदाराला स्वतः पुरवावे लागेल (उदा. फिनाईल, सिंधी झाडु, खराटे, डांबर गोळया, ॲसिड, बादली, मग, मुलायम झाडु, ओडोनील, हापिंक, इत्यादी) साहित्य दररोज साफसफाई करतांना वापरावे लागेल. साफसफाईचे साहित्य गुणवत्ता तपासणी करिता प्रभारी अधिकारी यांच्या अवलोकनार्थ वेळोवेळी सदर करावे लागेल.

१५ सफाई कामगाराला कर्तव्य वेळेत धुम्रपान किंवा मादक पदार्थाचे सेवन करता येणार नाही. तसेच संस्थेच्या आवारात कोणताही व्यवसाय करता येणार नाही.

१६ मुलीच्या वसतिगृहात सफाई करण्याकरीता नियमित स्वरुपात स्त्री सफाई कामगारच ठेवावी लागेल, पुरुष सफाई कामगाराला मुलींच्या वसतीगृहात पूर्व परवानगी शिवाय प्रवेश राहणार नाही.

१७ सफाई कामगार गुन्हेगारी प्रवृत्तीचा नसावा, बालकामगार/बालमजूर नसावा.

१८ सफाई कामगारांची वागणुक संस्थेतील अधिकारी /कर्मचारी आणि विदयार्थ्यांशी सौहार्दपूर्ण असावी.

१९ सफाई कामगारांनी कर्तव्यावर हजर होतांना तसेच संस्थेतून बाहेर जाताना सुरक्षा रक्षकांच्या चौकीवर नोंदणी करणे आवश्यक राहील.

२० स्वच्छता गृहात पाणी उपलब्ध आहे किंवा नाही याची शहा निशा करणे बाबतची जबाबदारी सफाई कामगाराची राहील आणि पाणी उपलब्ध नसल्यास संबंधीत अधिकारी यांना कळविणे व सदर परिस्थितीत स्वच्छता गृहामध्ये पाण्याचा ड्रम भरणे ही जबाबदारी सफाई कामगाराची राहिल.

२१ निविदाधारक यांच्याजवळ ३०० फुट पाईप (साईज १/२ किवा ३/४") असणे आवश्यक आहे.

२२ आपली एजन्सी शासकीय नियमानुसार पंजीकृत असावी व त्याचे नुतनीकरण वेळोवेळी नियमानुसार करावे.

२३ एजन्सी मार्फत लेबर कायदा (Labour Act) आणि कारखाना कायदा (Factory Act) अंतर्गत असलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

२४ आपण नेमलेल्या सफाई कामगारांचा मोबदला हा किमान वेतन कायदा (Minimum Wages Act) व कर्मचारी भरपाई कायदा (Employee Compensation Act) नुसार पंजीकृत रक्कम अदा करणे ही सर्वस्वी जुबाबदारी आपल्या एजन्सीची राहील.

२५ सफाई कामगाराचा सहभागी भविष्य निर्वाह निधी (EPF) असल्यास संबंधित एजन्सीला भरणे बंधनकारक राहील त्याचा शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तीजापुर या संस्थेशी काही संबंध राहणार नाही.

२६ सफाई कामगार यांनी त्यांना शासकीय सेवेत सामावुन घेणेबाबत कामगार न्यायालय / महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण इ. यांचेकडे धाव घेतल्यास संस्था प्रमुख शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तीजापुर / वरिष्ठ कार्यालय जवाबदार राहणार नाही, तसेच त्यांचा दावा ग्राहय धरण्यात येणार नाही.

२७ दर महिन्याचे देयक सादर करताना कोषागाराला आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्रे कार्यालयात सादर करावी लागतील.

२८ कंत्राटदाराकडुन प्राप्त झालेले सफाई कामगाराचे देयक हे कोषागार कार्यालयाकडून पारीत झाल्यानंतर वितरीत करण्यात येईल तसेच काही तांत्रिक अडचण उदभवल्यास देयकास विलंब होऊ शकतो.

२९ सफाई एजन्सी, संस्थेच्या प्राचार्या सोबत महिन्यातून एकदा तथा आवश्यकतेनुसार सफाई यंत्रणेबाबत चर्चा करतील.

३० प्रत्यक्ष अनुभवानंतर प्राचार्य, शा. तं.नि. मुर्तीजापुर यांना येणारी अडचण लक्षात घेवून आपणांस कळविल्यास ती बाब आपणास बंधनकारक राहील.

३१ सफाईगार एजन्सी मार्फत उपलब्ध केलेल्या मनुष्यबळातून एक सुपरवायजर नेमून स्वच्छतेबाबत समन्वय राखणे आवश्यक राहील.

३२ निविदा पाकिटावर करार पदधतीने सफाई कामगार पुरविणे बाबत निविदा असा स्पष्ट उल्लेख असावा.

३३ निविदा सादर करतेवेळी निविदा फॉर्मचे अवलोकन करावे तसेच निविदा दोन लिफाफा पदधतीने सादर करावी. निविदा अर्जासोबत लिफाफा क्र.१ मध्ये पासपोर्ट आकाराचे दोन फोटो व निविदा अर्ज क्र.०१ वर नमुद सहपत्र सोबत जोडावेत. निविदा अर्जासोबत लिफाफा क्र.२ मध्ये पाच पुरुष व एक महिला (अंशकालीन) यांचे दर पुर्ण महिन्याकरीता (साफ सफाई साहित्यासह) प्रति माह प्रमाणे दिलेल्या रकान्यामध्ये भरावा.

३४ आपली निविदा स्विकारण्यात आल्यास निविदा करार रक्कमेच्या दुप्पट (परंतु हजार च्या पटीत) रोख सुरक्षा ठेव कार्यालयास जमा करावे लागेल, हि सुरक्षा ठेव करार रदद झाल्यानंतरच परत देय राहील.

३५ निविदा भरतेवेळी प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तीजापुर (Principal Government Polytechnic Murtizapur) यांचे नावे धनाकर्ष / Demand Draft (D.D.) payable at Murtizapur रुपये २०,०००/- (रुपये वीस हजार फक्त) निविदा सोबत लिफाफा क्र.०१ मध्ये दयावा लागेल, ज्यांची निविदा स्विकारण्यात आली नसेल त्यांना निविदा उघडण्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत त्यांनी सादर केलेलाच DD त्यांना परत करण्यात येईल.

३६ सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त) स्टँप पेपरवर करारनामा करुन दयावा लागेल.

दि. ०४.०३.२०२६ रोजीच्या साफसफाई कंत्राट निविदा प्रक्रिया समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार उपरोक्त अनु.०१ ते ३६ या नियम व अटी ठरविण्यात आलेल्या आहेत.

प्राचार्य,
शा. तं. नि. मुर्तीजापूर